# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

## स्थानिक संस्था कर विभाग

## स्थानिक संस्था कर मार्गदर्शक पुस्तिका

(सदरची पुस्तिका ही निव्वळ मार्गदर्शनासाठी आहे. यामध्ये नमुद केलेली विधाने व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० यामध्ये विसंगती आढळल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० हे अंतिम असतील.

# स्थानिक संस्था कर मार्गदर्शक पुस्तिका

## १. नोंदणी कोणी करावी ?

**क. आयातदार - म्हणजेच शहराच्या हद्दीबाहेरुन शहराच्या हद्दीत माल आणणारा अथवा आणविणारा व्यापारी / उद्योजक**

१. नियम ३ [१] अनुसूची क मधील मालाच्या खरेदीची किंवा विक्रीची उलाढाल वर्षभरात रु. ५०००/- पेक्षा कमी नाही

२. वर्षभरात त्यांनी आयात केलेल्या सर्व मालाचे मूल्य रु. ५०००/- पेक्षा कमी नाही.

३. वर्षभरामध्ये त्याची विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल ही रुपये १,००,०००/- पेक्षा कमी नाही.

वरील तिन्ही अटींची पुर्तता करणारा प्रत्येक व्यापारी / उद्योजक नोंदणीस पात्र होतो.

**ख. केवळ शहराच्या हद्दीतील व्यापा-यांकडूनच खरेदी करणारा व्यापारी / उद्योजक**

१. स्थानिक संस्था कराच्या दरसुचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या खरेदीची उलाढाल वर्षभरात रु. ५०००/- पेक्षा कमी नाही.

२. त्याची सर्व विक्रीची उलाढाल वर्षभरात रु. १.५ लाखापेक्षा कमी नाही.

वरील दोन्ही अटींची पुर्तता झाल्यास प्रत्येक व्यापारी नोंदणीस पात्र ठरतो.

## २. तात्पुरत्या स्वरुपात धंदा करणा-या व्यापा-यास नोंदणी करणे आवश्यक आहे काय ?

होय.

## ३. खरेदी-विक्रीची उलाढाल म्हणजे काय ?

व्यापा-याने केलेल्या सर्व विक्रीची उलाढाल किंवा सर्व खरेदीची उलाढाल ही हिशोबात घेण्यात येईल. अशा मालाची विक्री किंवा खरेदी ही या अधिनियमाच्या आणि नियमाच्या तरतुदी

अन्वये करयोग्य असो किंवा नसो. उलाढालीमध्ये व्यापा-याने स्वतःच्या वतीने आणि त्याच्या लेख्यामध्ये नमुद केलेल्या सर्व विक्रीचा किंवा खरेदीचा अंतर्भाव असेल. तसेच व्यापा-याने किंवा व्यापा-याचे वतीने लिलाव केलेल्या मालाच्या रकमेचा समावेश उलाढालीमध्ये होईल.

**४. अनिवासी व्यापा-याने नोंदणी करणे आवश्यक आहे काय ?**

होय अनिवासी व्यापा-याने नोंदणी करणे आवश्यक आहे तसेच अनिवासी व्यापा-याचा शहरामध्ये राहणारा एखादा व्यवस्थापक किंवा एजंट याने देखील नोंदणी करणे आवश्यक आहे मग असा अनिवासी व्यापारी, व्यवस्थापक, एजंट स्थानिक संस्था कराच्या तरतूदी नुसार नोंदणी करण्यासाठी पात्र असो किंवा नसो.

**५. स्थानिक संस्था कराची नोंदणी करण्याची व्यवस्था कोठे आहे ?**

अ प्रभाग कार्यालयासाठी हेगडेवार भवन,निगडी, ब व ड प्रभाग कार्यालयासाठी एस.आर.ए. कार्यालय, चिंचवड पोलीस स्टेशन लगत, चिंचवड, क प्रभाग कार्यालयासाठी क प्रभाग पहिला मजला, पॉलीग्रास मैदानाशेजारी, नेहरूनगर, पिंचिमनपा मुख्य कार्यालय, जकात विभाग.

**६. व्यापारी जर भागीदारी संस्था असेल आणि जर ती भागादारी संस्था विसर्जित झाली आणि जर त्या भागीदारी संस्थेकडे स्थानिक संस्था कराची बाकी असेल तर असा बाकी असलेला कर कोणी भरावा ?**

त्या भागीदार किंवा अशा भागीदारी संस्थेच्या विसर्जनापर्यंत सदस्य असलेला प्रत्येक व्यक्ती स्थानिक संस्था कर व्याजासहीत भरण्यास पात्र असेल.

**७. एखाद्या व्यापा-याने त्याचा व्यवसाय हस्तांतरीत केला असेल आणि जर त्याच्याकडे स्थानिक संस्था कराची बाकी असेल अशा वेळी स्थानिक संस्था कोण भरेल ?**

ज्या व्यक्तीकडे असा व्यवसाय हस्तांतरीत केला आहे ती व्यक्ती स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र असेल.

८. **नोंदणीसाठी पात्र असलेला व्यापारी नोंदणीशिवाय व्यवसाय करु शकतो काय ?**

नाही. तसे केल्यास दंडाची तरतुद आहे.

९. **१ एप्रिल २०१३ रोजी पुर्वीच्या वर्षामध्ये ज्या व्यापा-याची खरेदी विक्रीची उलाढाल एक लाखापेक्षा कमी आहे, परंतु १ एप्रिल २०१३ रोजी जर तो या नियमान्वये नोंदणीस पात्र असेल अशावेळी त्याने नोंदणी आवश्यक आहे काय?**

होय. ज्या तारखेस खरेदी विक्रीची उलाढाल एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त झाली असेल त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदणी करणे बंधनकारक आहे.

१०. **ज्या व्यापा-यास तात्पुरत्या स्वरुपात धंदा/व्यवसाय करावयाचा आहे अशा व्यापा-याने काय करावे?**

तात्पुरत्या स्वरुपात धंदा / व्यवसाय सुरु करण्यापुर्वी १५ दिवस अगोदर नोंदणीसाठी अर्ज करणे बंधनकारक आहे.

११. **कोणत्या व्यापा-यास नोंदणीकृत व्यापारी असल्याचे मानण्यात येईल?**

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम २००२ च्या तरतुदीन्वये ज्याची नोंदणी झाली आहे अशा प्रत्येक व्यापा-यास नोंदणीकृत व्यापारी असल्याचे मानण्यात येईल.

१२. **नोंदणीसाठी शुल्क आकारले जाते काय?**

नोंदणी **नमुना क** भरुन र.रु. १००/- नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

१३. **नोंदणीसाठी अर्ज कोणी करावा ? अथवा नोंदणीसाठी कोण अर्ज करु शकतो?**

अ] व्यवसायाचे मालक अथवा मालकाच्या वतीने कामकाज करण्यासाठी प्राधिकृत असलेली व्यक्ती.

ब] भागीदारी संस्था असेल तर तिचे भागीदार.

क] अविभक्त हिंदू कुंटूंबाचा व्यवसाय असेल तर त्या कुटूंबातील कर्ता व्यक्ती.

ड]   व्यावसायिक कंपनी , सहकारी संस्था, महामंडळ, स्थानिक प्राधिकरण असेल अशा बाबतीत संचालक / व्यवस्थापक / सचिव / प्रमुख अधिकारी किंवा त्यांच्या वतीने काम करण्यासाठी कायदेशीर रित्या प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती.

इ]   भागीदारी संस्थांच्या बाबतीत तिचा प्रत्येक भागीदार नोंदणी अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर करील.

ई]   प्रत्येक नोंदणी अर्जांसोबत जी व्यक्ती नोंदणीसाठी अर्ज करीत आहे तिचे स्वतःचे दोन पासपोर्ट फोटो देणे बंधनकारक आहे.

**१४.  नोंदणीसाठी करण्यात येणा-या अर्जामध्ये व्यावसायिक ज्या वस्तुंचा व्यापार करतो त्या सर्व वस्तुंची नोंद करणे आवश्यक आहे काय ?**

होय.

**१५.  एखाद्या व्यापा-याची एकाच नावाने व्यवसायाची ठिकाणे एकापेक्षा जास्त असतील तर नोंदणीसाठी किती अर्ज करावेत ?**

एकच अर्ज करावा. परंतु त्यामध्ये सर्व ठिकाणांची नोंद असावी. जेवढया ठिकाणी व्यवसायाची ठिकाणे आहेत तेवढी प्रमाणपत्रे स्थानिक संस्था कर विभागाकडून घेण्यात यावीत व ती व्यवसायाच्या प्रत्येक ठिकाणी लावण्यात यावीत.

**१६.  नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरीत करता येईल काय ?**

नाही.

**१७.  नोंदणी प्रमाणपत्र कोठे लावावे ?**

व्यवसायाचे ठिकाणी, दर्शनी बाजूस.

**१८.  धंद्यामध्ये/व्यवसायामध्ये काही बदल करावयाचा झाल्यास काय करावे ?**

धंद्यामध्ये/व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करावयाचा झाल्यास त्याबाबतची लेखी

माहिती मा. आयुक्त यांना देणे बंधनकारक आहे. [उदा. आयात करावयाच्या वस्तुमध्ये बदल, भागीदारामध्ये बदल यासारखे इतर बदल.]

**१९. नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी मा. आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे काय ?**

होय. ज्यांना व्यवसाय बंद करावयाचा आहे अशा व्यावसायिकांनी लेखी नमुन्यामध्ये अर्ज करणे बंधनकारक आहे.

**२०. एखाद्या व्यापा-याने धंद्याच्या नावामध्ये बदल केला असेल किंवा जर ती भागीदारी संस्था असेल आणि तिचे विसर्जन न करता रचनेत बदल केला असेल किंवा तो विश्वस्त व्यवस्थेचा विश्वस्त असेल आणि त्या विश्वस्तामध्ये बदल झाला असेल किंवा तो पाल्याचा पालक असेल व पालकामध्ये बदल झाला असेल तर अशा वेळी परत नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता आहे काय?**

नाही. फक्त बदलाबाबतची सविस्तर माहिती स्थानिक संस्था कर विभागास पुरविणे आवश्यक आहे. त्यानंतर नोंदणी प्रमाणपत्रामध्ये त्याप्रमाणे बदल करुन घ्यावेत .

**२१. नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे/झाल्यामुळे नोंदणी प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या दिनांकापुर्वी जर त्या व्यावसायिकाकडे स्थानिक संस्था कर/दंड/व्याज इ. ची रक्कम बाकी असेल अशा वेळी अशी रक्कम कोण भरेल ?**

अशी रक्कम भरण्याची जबाबदारी ही संबधित व्यावसायिकाची असेल.

**२२. धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव व्यापा-याने जाहिर करणे आवश्यक आहे काय?**

होय. एक महिन्याच्या आत व्यवस्थापकाचे नाव "**नमुना च**" मध्ये मा.आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे.

**२३. व्यापा-यांनी खरेदी केलेल्या मालाची लेखी नोंद ठेवणे आवश्यक आहे काय?**

होय. **"नमुना घ"** मध्ये सदरची लेखी नोंद ठेवणे बंधनकारक आहे.

**२४. एखाद्या नोंदणीकृत व्यापा-याने शहरातील इतर व्यापा-यांकडून करयोग्य माल खरेदी केला असेल अशावेळी माल खरेदी करणा-या व्यापा-याने काय करावे ?**

शहरातील ज्या व्यापा-याकडून करयोग्य माल खरेदी केलेला आहे त्या व्यापा-याकडून स्थानिक संस्था कर नियम २१ व २२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे माल खरेदी करणा-या व्यापा-याने त्या मालाचे बिजक व प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

**२५. मनपा क्षेत्रामध्ये व्यवसाय करणा-या व्यावसायिकाने मनपा क्षेत्रातील कोणत्याही इतर व्यावसायिकास माल विकला असेल तर याबाबत विक्री करणा-या व्यापा-याने काय करावे ?**

अशा विक्री करणा-या व्यापा-याने स्थानिक संस्था कर नियम २२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बीजके व प्रमाणपत्रे माल खरेदी करणा-यास देणे बंधनकारक आहे. तसेच खरेदी करणा-या व्यावसायिकाची नोंद त्याच्याकडील खरेदी विक्री रजिस्टरमध्ये ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये त्याचा संपुर्ण पत्ता, त्याच्या धंद्याचे स्वरुप व त्याच्याकडील व्यवसायाचा स्थानिक संस्था कराचा नोंदणी क्रमांक याचा समावेश असेल .

**२६. रास्त बाजार मूल्य निर्धारित करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहेत काय ?**

होय. असे अधिकार आयुक्त यांना आहेत. ज्यावेळी रास्त बाजार मुल्य निर्धारित करणे आवश्यक वाटेल अशावेळी माल आयात करणा-या व्यापा-याचे म्हणणे ऐकून घेऊन रास्त बाजार मुल्य निश्चित करता येईल.

**२७. मनपा हद्दीमध्ये विक्री / उपभोग / उपयोग या कारणांसाठी कोणत्याही व्यापा-याने किंवा व्यक्तीने अशा मालाची विक्री किंवा खरेदीची किंमत निश्चित केलेली नसेल किंवा असा माल विक्री किंवा खरेदी द्वारे**

**मिळविलेला नसेल अशा मालाच्या बाबत त्या मालाची किंमत निश्चित करता येऊ शकेल काय ?**

होय. अशा मालाच्या बाबत किंमत निश्चित करता येईल. आयुक्त संबंधित व्यापा-यास किंवा व्यक्तीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन अशा वस्तुंची रास्त बाजार मुल्य निश्चित करतील [ नियम २५ ]

**२८. शहरामधून माल घेऊन जाणा-या वाहनास थांबविले जाऊ शकेल काय ?**

होय. आयुक्त यांच्या आदेशान्वये शहरामधून माल घेऊन जाणा-या वाहनास थांबवून संबंधित वाहन चालकाकडे / वाहतुकदाराकडे मालाची देयके / कागदपत्रे, निरिक्षण करण्यासाठी मागणी करता येईल. अशा वेळी अशी कागदपत्रे संबंधित अधिका-यास दाखविणे आवश्यक आहे.

**२९. एखाद्या व्यापा-याने मनपाच्या हद्दीतून माल वाहतुक करीत असताना वाहनातील मालाची कागदपत्रे संबंधित अधिका-यास दाखविली नाहीत तर अशा वेळी काय करवाई होऊ शकेल ?**

स्थानिक संस्था कर नियम २६ [२] अन्वये अशा मालाच्या किंमतीवर होणारा स्थानिक संस्था कर , त्यावरील देय व्याज व यथास्थिती दंड रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येईल.

**३०. स्थानिक संस्था करामध्ये ठोक रक्कम भरण्याची तरतुद आहे काय ?**

होय. अशी तरतुद पुढील रकमेच्या मर्यादेपर्यंत आहे.

| **अ.क्र.** | **वर्षभरातील सर्व खरेदीची उलाढाल** | **दरवर्षी प्रदेय असलेला स्थानिक संस्था कर** |
|---|---|---|
| १. | रुपये १,००,००० पर्यंत | काही नाही. |
| २. | रुपये १,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये २,००,००० पेक्षा अधिक नसेल | ४,००० |
| ३. | रुपये २,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ३,००,००० पेक्षा अधिक नसेल | ६,००० |

| | | |
|---|---|---|
| ४. | रुपये ३,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ४,००,००० पेक्षा अधिक नसेल | ८,००० |
| ५. | रुपये ४,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ५,००,००० पेक्षा अधिक नसेल | १०,००० |
| ६. | रुपये ५,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ६,००,००० पेक्षा अधिक नसेल | १२,००० |
| ७. | रुपये ६,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ७,००,००० पेक्षा अधिक नसेल | १४,००० |
| ८. | रुपये ७,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ८,००,००० पेक्षा अधिक नसेल | १६,००० |
| ९. | रुपये ८,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये ९,००,००० पेक्षा अधिक नसेल | १८,००० |
| १०. | रुपये ९,००,००० पेक्षा अधिक परंतु रुपये १०,००,००० पेक्षा अधिक नसेल | २०,००० |

१० लाखापेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापा-याने त्यावर नियमाप्रमाणे होणारा स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आहे.

**३१. राज्य व केंद्र सरकारने मनपा हद्दीमध्ये आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कर लागू होईल काय ?**

नाही. परंतु संबंधित शासकीय अधिका-याने असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यावर स्थानिक संस्था कर लावला जाणार नाही.

**३२. एखाद्या व्यापा-याने त्याच्याकडील कोणताही माल शहराच्या बाहेर प्रक्रिया करण्यासाठी पाठविला असेल व त्यावर प्रक्रिया करुन तो माल परत शहरामध्ये आणला जात असेल अशावेळी त्या पुर्ण मालावर स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आहे काय ?**

त्या संपुर्ण मालावर स्थानिक संस्था कर भरण्याची आवश्यकता नाही परंतु प्रक्रिया साठी बाहेर पाठविलेला माल प्रक्रिया केल्यानंतर जर त्याच्या बाहय स्वरुपामध्ये बदल होत नसेल तर अशावेळी फक्त प्रक्रियासाठी लागलेल्या मुल्यावर म्हणजेच प्रक्रियेचा खर्च व स्थानांतर खर्च यावर स्थानिक संस्था कर आकारण्यात येईल. परंतु असा शहरामध्ये बाहेर गेलेला माल शहराबाहेर पाठविल्याच्या दिनाकांपासून ६ महिन्याच्या आत संबंधित व्यापा-याने शहरामध्ये

आणणे आवश्यक आहे. व अशा व्यापा-याने या मालाची नोंद संबंधित कालावधीच्या विवरण पत्रामध्ये ठेवली पाहिजे.[नियम २८(३)]

**३३. शहरातील व्यापारी शहराबाहेरील माल प्रक्रिया कामाच्या तत्वावर शहरामध्ये आयात करुन त्यावर प्रक्रिया करुन परत पाठवित असेल तर अशावेळी स्थानिक संस्था कर आकारण्यात येईल काय ?**

नियम २८ (४) मधील तरतूदींची पूर्तता होत असेल तर अशा मालावर स्थानिक संस्था कर आकारला जाणार नाही.

**३४. शहरामधील माल शहराबाहेर विकलेला असेल आणि अशा खरेदीदाराने माल नाकारल्यामुळे तो परत पाठविला असेल तर त्यावर स्थानिक संस्था कर भरावा लागेल काय ?**

नाही परंतू असा माल शहराबाहेर पाठविलेल्या तारखेपासून ६ महिन्यांचे आत शहरामध्ये परत मिळालेला असला पाहिजे तसेच अशा मालाची विक्रि सबधीत कालावधीच्या विवरणामध्ये दाखविलेली होती अशी आयुक्तांची खात्री पटली पाहिजे

**३५. विवरण पत्र सादर करण्याच्या पध्दती कोणत्या आहेत ?**

**अ.** ज्या व्यापा-यास नियम २७ प्रमाणे आयुक्त यांनी ठोक रक्कम भरण्याची परवानगी दिली आहे अशा व्यावसायिकाने विवरण पत्र **नमुना ड २** मध्ये सादर करणे आवश्यक आहे. ज्या तारखेस वर्ष संपते त्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत असे विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

**ब.** ज्या व्यापा-यास नियम २७ अन्वये ठोक रक्कम भरण्याची परवानगी आयुक्त यांनी दिलेली नाही. अशा नोंदणीकृत व्यापा-याने पहिल्या ६ महिन्यासाठी विवरण पत्र **नमुना ड १** सादर करणे आवश्यक आहे हा कालावधी संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत व संबंधित वर्षातील वार्षिक विवरण पत्र **नमुना ड २** मध्ये सादर करणे आवश्यक आहे. [ नियम २९ (२) ]

क. नियम ३ उपनियम २ अन्वये नोंदणीस पात्र असलेला प्रत्येक व्यापारी किंवा व्यक्ती धंदा सुरु असलेल्या कालावधीतील प्रत्येक महिन्याच्या अखेरच्या दिनांकापासून किंवा धंदा एखाद्या कालावधीपर्यंत बंद केला असेल तर अशा महिन्याच्या दिनाकांपासून १० दिवसांमध्ये स्थानिक संस्था कर प्राधिका-याकडे **नमुना ड १** मध्ये विवरण पत्र सादर करील.

**३६. निर्यातीसाठी शहरामध्ये आयात केलेला माल शहराबाहेर निर्यात केल्यास त्या मालावर भरलेला स्थानिक संस्था कर परत मिळेल काय ?**

नियम ३२ अन्वये शहरामध्ये निर्यातीसाठी आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कर भरला असेल आणि त्या मालावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता शहराबाहेर पाठविला असेल म्हणजेच नियम ३२ मधील सर्व अटींची पुर्तता होत असेल तर अशावेळी संबंधित व्यापा-याने भरलेल्या स्थानिक संस्था करापैकी ९० % रक्कम परत मिळेल.

**३७. स्थानिक संस्था कराची रक्कम केव्हा भरावी ?**

स्थानिक संस्था कराची रक्कम तो महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे.

**३८. विक्री करणा-या व्यापा-याने विक्री केलेल्या मालाचे बिल न दिल्यास किंवा बिल देण्यास नकार दिल्यास त्यावर काय कारवाई होईल ?**

अशा वेळी विक्री करणा-या व्यापा-यावर त्याने विक्री केलेल्या मालावर जेवढा स्थानिक संस्था कर होत असेल तेवढी रक्कम विक्री करणा-या व्यापा-याचे म्हणणे ऐकून त्यांच्याकडून वसुल केली जाईल. [ नियम ४८ (१) ]

**३९. एखाद्या व्यापा-याने नोंदणी न करता व्यापार चालू ठेवला असेल अशावेळी काय कारवाई होऊ शकेल ?**

नोंदणी न करता ज्या व्यापा-याने त्याचा व्यवसाय चालू ठेवला असेल त्या काळामध्ये त्याने आयात केलेल्या मालावर जेवढया रकमेचा स्थानिक संस्था कर होईल त्याच्या १० पट रक्कम त्यांच्याकडून वसुल करण्यात येईल.

**४०. एखाद्या व्यापा-याने स्थानिक संस्था कर बसण्याजोगा माल शहरामध्ये आणून विकला व त्यावर नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरला नाही तर अशावेळी काय तरतुद आहे ?**

याबाबत स्थानिक संस्था कराच्या पाच पट दंड वसुल करण्याची तरतुद आहे.

**४१. एखाद्या व्यापा-याने जाणूनबुजून चुकीची , खोटी परताव्याची मागणी केल्यास अशावेळी काय तरतुद आहे ?**

अशाबाबत स्थानिक संस्था कराच्या पाच पट दंड वसुल करण्याची तरतुद आहे.

**४२. ज्या तारखेस स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आहे त्या तारखेस स्थानिक संस्था कर भरला नाही तर काय तरतुद आहे ?**

अशा तारखेपासून पुढील १२ महिन्यांपर्यंत दरमहा २ % प्रमाणे व्याज वसुल करण्याची तरतुद आहे. आणि एखाद्या व्यापा-याने स्थानिक संस्था कर देण्यामध्ये कसूर चालू ठेवल्यास अशावेळी पुढील प्रत्येक महिन्यापासून ३ % प्रमाणे व्याज आकारण्याची तरतुद आहे.

**४३. एखाद्या व्यापा-याने स्थानिक संस्था कर भरण्यासाठी खोटी बिले, खोटी उद्घोषणा प्रमाणपत्रे, खोटी कागदपत्रे सादर केल्यास अशावेळी काय तरतुद आहे ?**

अशावेळी स्थानिक संस्था कराच्या रकमेच्या दुपटीपेक्षा जास्त नसेल एवढी रक्कम वसुल करण्याची तरतुद आहे . [ नियम ४८ (४) क ]

------------